**युद्धात, युद्धजन्य परिस्थितीमध्ये तसेच देशातील सर्वच क्षेत्राअंतर्गत सुरक्षा संबंधी मोहिमेत, चकमकीत/ देशाबाहेरील मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या आणि अपंगत्व आलेल्या जवानांना आर्थिक मदत.**

## महाराष्ट्र शासन

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः सैकवि-२०२६/प्र.क्र.२३३/मासैक (२८)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १६.१०.२०२६

**वाचा:**

१. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्रमांक: मासैम-१०९९/१६६७/प्र.क्र.१२६/९९/२८, दिनांक ४/१०/२०००
२. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्रमांक: मासैम-२०१६/प्र.क्र.९२(१)/२०१६/२८, दिनांक ३०/११/२०१६.
३. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्रमांक: मगौपु-२०१७/प्र.क्र.३६०/२८, दि. ३१/०१/२०१९
४. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्रमांक: मासैम-२०१९/प्र.क्र.६८/२०१९/२८, दि. २/८/२०१९
५. शासन निर्णय, सा.प्र.वि., क्रमांक: संकीर्ण -२०२२/प्र.क्र. २९४/२८, दि. ०७/०७/२०२६
६. शासन निर्णय, शुद्धिपत्रक सा.प्र.वि., क्रमांकः संकीर्ण -२०२२/प्र.क्र. २९४/२८ दि.१७/८/२०२६

**प्रस्तावना :-**

युध्दात, युध्दजन्य परिस्थितीमध्ये तसेच देशातील सुरक्षा संबंधी मोहिमेत, चकमकीत देशाबाहेरील मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या आणि अपंगत्व आलेल्या जवानांना व त्यांच्या अवलंबित देण्यात येणारे एकरकमी अनुदान शासकीय अनुदानातून ५० टक्के व उर्वरीत ५० टक्के मुख्यमंत्री सहायता (कारगील) निधीतून घेण्यात आलेल्या व राष्ट्रीयकृत बँकेत गुंतविण्यात आलेल्या रकमेवरील व्याजातून देण्याची तरतूद होती.

२. संदर्भ क्र. ५ व ६ नुसार युध्दात, युध्दजन्य परिस्थितीमध्ये तसेच देशातील सुरक्षा संबंधी मोहिमेत, चकमकीत देशाबाहेरील मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या आणि अपंगत्व आलेल्या जवानांना अनुज्ञेय आर्थिक मदत १००% शासकीय निधीतून देण्याबाबतची बाब विचाराधीन होती. याबाबत शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला.

**शासन निर्णय :-**

युद्धात, युद्धजन्य परिस्थितीमध्ये तसेच देशातील सुरक्षा संबंधी मोहिमेत, चकमकीत देशाबाहेरील मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या आणि अपंगत्व आलेल्या जवानांना व त्यांच्या अवलंबित यांना देण्यात येणारे एकरकमी रोख अनुदान तसेच मरणोत्तर शौर्यपदक धारकांच्या विधवा/अवलंबितांना देण्यात येणारे मासिक अनुदान या योजनेअंतर्गत खालील नमूद लाभार्थ्यांस पुढीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | जवानाचे नाव | अपंगत्व प्राप्त झाल्याचा दिनांक | अनुज्ञेय रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | लान्स हवलदार भैराप्पा यशवंत लंगोटे | दिनांक ०१ नोव्हेंबर २०२१ रोजी न्योमा, लेह येथे ऑपरेशनल-केंद्रीत प्रशिक्षण घेत असताना पाठीच्या कण्याच्या सर्वात वरच्या मणक्याचे हाड मोडल्याने त्यांना २०% अपंगत्व आले. | २०,००,०००/- |
| २ | शॅपर रोहित रामराव पाटील | दिनांक २७ मार्च २०२३ रोजी “ऑपरेशन स्नो लेपर्ड” अंतर्गत प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर ऑपरेशनल कर्तव्य बजावत असताना, सैनिकाच्या डोक्याला सोम्य दुखापत झाली आणि चेहऱ्याच्या हाडांचे फॅक्चर होऊन अपघातानंतर चेहऱ्याचे विद्रुपीकरण झाल्याने त्यांना ३५.५ % अपंगत्व आले. | ३४,००,०००/- |
| **एकूण (अक्षरी रुपये चोपन्न लक्ष)** | | | **५४,००,०००/-** |

२. उपरोक्त नमूद योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनुज्ञेय आर्थिक मदत "मागणी क्र. ए-५ लेखाशीर्ष २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ६० इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम, १०२-सामाजिक सुरक्षा योजनेखाली निवृत्तीवेतने, (००) (०४) देशांतर्गत सुरक्षासंबंधी मोहिमेत / चकमकीत धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या विधवांना / अवलंबितांना तसेच अपंगत्व प्राप्त झालेल्या अधिकारी / जवानांना आर्थिक मदत (अनिवार्य), ५०-इतर खर्च (२२३५ २६०८)" या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर अनुदानातून खर्ची करण्यात यावी.

३. या प्रकरणी लाभार्थ्यांच्या निवासी पत्त्यानुसार "आहरण व संवितरण अधिकारी", म्हणून जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सांगली यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. सदर आर्थिक मदत ECS द्वारे देण्यात यावी व सदरहू शासन निर्णयात दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

५ . सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.९९/व्यय-४ दि.१२.२.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१६१५५२२०४५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by GANESH NIVRUTTI PAWAR
Date: 2026.10.16 15:54:24 +05'30'

**( गणेश पवार )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. मा. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मासैक) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई,
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, मुंबई,
४. महालेखापाल (स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा) महाराष्ट्र, मुंबई-३२,
५. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे-४११००१.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली.
७. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सांगली.
८. लान्स हवलदार भैराप्पा यशवंत लंगोटे, मु.पो.जिरग्याळ, ता.जत, जि.सांगली- ४१६ ४०२.
९. शॅपर रोहित रामराव पाटील, मु.पो.अंजनी, ता.तासगाव जि.सांगली- ४१६ ३११
१०. सह संचालक, लेखा व कोषागार, संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मुंबई ३२,
११. वित्त विभाग (व्यय ४), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१२. सामान्य प्रशासन विभाग/ कार्यासन २५, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१३. निवड नस्ती (२ प्रती),
१४. संग्रहार्थ.